# शासकीय सहकार व लेखा पदविका मंडळ (जी. डी. सी. ॲण्ड ए. बोर्ड)

## दिनांक २३ मे, २४ मे व २५ मे २०१५ रोजी होणाऱ्या शासकीय सहकार व लेखा पदविका (जी. डी. सी. ॲण्ड ए.) परिक्षा व सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रमाणपत्र (सी. एच. एम.) परीक्षेच्या कार्यक्रमाबाबत अधिसूचना

शासकीय सहकार व लेखा पदविका मंडळ (जी. डी. सी. ॲण्ड ए. बोर्ड) कडून घेण्यात येणारी **शासकीय सहकार व लेखा पदविका (जी. डी. सी. ॲण्ड ए.) परिक्षा** व **सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रमाणपत्र (सी. एच. एम.)** परीक्षा राज्यातील मुंबई, ठाणे, नाशिक, जळगांव, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद, लातूर, अकोला, अमरावती, नागपूर व चंद्रपूर अशा सोळा जिल्हयांच्या ठिकाणी संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचेमार्फत **दिनांक २३ मे, २४ मे व २५ मे २०१५** रोजी घेण्यात येणार आहे.

चालू वर्षापासून परिक्षार्थीकडून Online पद्धतीनेच अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. Online Applicaton व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारे या परिक्षेसाठी अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची सर्व परिक्षार्थींनी नोंद घ्यावी. Online अर्ज भरताना तयार केलेला स्वतःचा User ID व Passward परिक्षार्थीनी परिक्षेचा निकाल प्रसिद्ध होईपर्यंत योग्य प्रकारे जतन करून ठेवणे आवश्यक आहे.

## परीक्षेच्या कार्यक्रमाबाबत ठळक बाबी

| | |
|---|---|
| **जी. डी. सी. ॲण्ड ए. परिक्षा व सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रमाणपत्र (सी. एच. एम.) परीक्षेच्या तारखा** | **दि. २३ मे, २४ मे व २५ मे २०१५** |
| **परिक्षा केंद्रे** | **मुंबई, ठाणे, नाशिक, जळगांव, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद, लातूर, अकोला, अमरावती, नागपूर व चंद्रपूर** |
| **Online अर्ज भरण्याची मुदत** | **दि. ०६/०२/२०१५ पासून दि. २६/०२/२०१५ पर्यंत** |
| **Online Applicaton साठी Website** | **www.mahasahakar.maharashtra.gov.in** |

१. **परीक्षेचे Online अर्ज भरण्याची मुदत दि. ०६/०२/२०१५ ते दि. २६/०२/२०१५ पर्यंत आहे.** Online अर्ज करण्याबाबत सविस्तर सूचना खात्याच्या Website **www.mahasahakar.maharashtra.gov.in** या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात येतील.

२. या परीक्षेस नव्याने बसू इच्छिणा-या परिक्षार्थींना, तसेच, पूर्वी परीक्षेस बसलेल्या परंतु अनुत्तीर्ण झालेल्या परिक्षार्थींना बसता येईल

### ३. परिक्षा केंद्राचे नाव व केंद्र संकेतांक (सेंटर कोड) :

उमेदवारांना खाली नमूद १६ परीक्षा केंद्रांपैकी कोणत्याही एका केंद्राची निवड करावी लागेल. एकदा निवडलेले केंद्र पुन्हा बदलता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

| **केंद्र** | मुंबई | ठाणे | नाशिक | जळगाव | अहमदनगर | पुणे | सोलापूर | सातारा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **संकेतांक** | ०१ | ०२ | ०६ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ |

| **केंद्र** | सांगली | कोल्हापूर | औरंगाबाद | लातूर | अकोला | अमरावती | नागपूर | चंद्रपूर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **संकेतांक** | १३ | १४ | १५ | २१ | २३ | २४ | २७ | २९ |

(परिक्षा केंद्रांचा तपशील व संपर्क क्रमांक परिशिष्ठ मध्ये आहे.)

## ४. <u>परिक्षेसाठी शैक्षणीक पात्रता / अनुभव पात्रता :</u>

- परिक्षार्थी मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असला पाहीजे

**- किंवा -**

- परिक्षार्थी बिगर-पदवीधर आणि सहकार खाते, कृषि उत्पन्न बाजार समिती व इतर सहकारी संस्थांमध्ये लिपीक व त्यापेक्षा वरिष्ठ या पदावर कार्यरत असल्यास -
  १) एच.एस.सी. उत्तीर्ण झाल्यानंतर -- ३ वर्षे सेवा पूर्ण झाली असली पाहिजे.
  २) एस.एस.सी. उत्तीर्ण झाल्यानंतर -- ५ वर्षे सेवा पूर्ण झाली असली पाहिजे.
  - ✓ सहकारी संस्थेच्या अथवा कृषि उत्पन्न बाजार समितीच्या बिगर-पदवीधर कर्मचाऱ्यांच्याबाबत अर्ज भरण्याच्या तारखेस परिक्षार्थी संस्थेमध्ये कार्यरत असणे आवश्यक आहे. या संबंधाने संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा अथवा सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. (प्रमाणपत्रामध्ये परिक्षार्थींचे नांव, पद, वेतनश्रेणी, जन्मदिनांक, पदस्थापना दिनांक, एस.एस.सी / एच.एस.सी.उत्तीर्ण दिनांक, सेवेमध्ये कायम होण्याची शक्यता आहे / नाही, संस्थेमध्ये सध्या कार्यरत आहे / नाही, या बाबींचा समावेश आवश्यक आहे.)
  - ✓ बिगर-पदवीधर परिक्षार्थी संस्थेत कायम झाला नसल्यास संस्थेकडून कायम करुन घेण्याचे हमी पत्र असणे आवश्यक आहे.

<u>अर्ज करतेवेळी वरील परिक्षेसाठी शिक्षण / अनुभव या बाबत पात्रता धारण करीत असल्याची परिक्षार्थींनी खातरजमा करुन घ्यावी.</u>

## ५. <u>Online अर्ज भरताना खालीलप्रमाणे स्कॅन प्रती तयार ठेवाव्यात -</u>

१. पासपोर्ट साईजचा अलीकडील फोटो
२. स्वाक्षरी
३. पदवीधर असल्यास मान्यता प्राप्त विद्यापिठाचे पदवी प्रमाणपत्र
४. माध्यमिक बोर्डाचे १० वी चे प्रमाणपत्र व गुणपत्र ( बिगर- पदवीधर, १०वी पास असल्यास)
५. उच्च माध्यमिक बोर्डाचे १२ वी चे प्रमाणपत्र व गुणपत्र (बिगर- पदवीधर, १२ वी पास असल्यास)
६. जी. डी. सी.ॲण्ड ए.परीक्षेत तसेच सी. एच. एम. परीक्षेत कोणत्याही विषयामध्ये ५० गुण प्राप्त झाले असल्यास सूट मागता येईल. यासाठी जी. डी. सी.ॲण्ड ए.परीक्षेत तसेच सी. एच. एम. परीक्षेचे मागील गुणपत्रक.
७. अनुभवाचा दाखला - संस्थेचा लेटरहेड वरील योग्य त्या प्राधिकाऱ्यांचे स्वाक्षरीने.
८. कायम करणार असल्याचे हमीपत्र (परिक्षार्थी सेवेमध्ये कायम नसल्यास) - संस्थेचा लेटरहेड वरील योग्य त्या प्राधिकाऱ्यांचे स्वाक्षरीने.
९. परीक्षा शुल्क चलनाने भरलेस त्याचे स्कॅन प्रत.
१०. महिलांसाठी - नावात बदल असल्यास विवाहित महिला परिक्षार्थींचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र / राजपत्र / प्रतिज्ञापत्र.

<u>Online अर्ज भरताना वरीलप्रमाणे स्कॅन प्रती तयार असणे आवश्यक आहे. Online अर्ज</u> स्वीकृतीसाठी वरील आवश्यक स्कॅन अपलोड (upload) करणे गरजेचे आहे याची कृपया नोंद घ्यावी. <u>अन्यथा संगणक प्रणालीमध्ये Online अर्ज स्वीकारला जाणार नाही.</u>

## ६. परिक्षा शुल्क :

१) जी. डी. सी. ॲण्ड ए. परीक्षा फी रु. ८००/-
२) सी. एच. एम. परीक्षा फी रु. ५००/-

- सदर रक्कम खालील प्रकारे भरता येईल.
  - i) Online Payment (Online Payment करण्याबाबत सविस्तर सूचना खात्याच्या Website वर उपलब्ध करुन देण्यात येतील), अथवा,
  - ii) चलनाद्वारे
- चलनाद्वारे परिक्षा शुल्क भरणा करण्यासाठी लेखाशिर्ष

**लेख्यांचे वर्गीकरण**

विभाग - ०४२५-को-ऑपरेशन
प्रधान शिर्ष - ८००-अदर रिसिटस
उपप्रधान शिर्ष - (ix)-एक्झामिनेशन फी
संगणक सांकेतांक - (०४२५०१२५)

- अस्वीकृत झालेल्या अर्जाचे शुल्क कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही.

## ७. विशिष्ठ विषयांसाठी सूट मिळण्याबाबत :

१. सन २००१ पूर्वीच्या परिक्षांना सूट मिळणार नाही.
२. यापूर्वीच्या जी. डी. सी. ॲण्ड ए. परीक्षेमध्ये अथवा सी. एच. एम. परीक्षेमध्ये कोणत्याही विषयामध्ये किमान ५० गुण प्राप्त झाले असल्यास त्या विषयांकरिता संबंधित परिक्षांमध्ये सूट मागता येईल. (वरील अट क्र. १ च्या आधीन राहून)
३. सी. एच. एम. प्रमाणपत्राच्या आधारे जी. डी. सी. ॲण्ड ए. परिक्षेचे विषय १ / २ / ३ साठी सूट मागावयाची असल्यास त्यासाठी जी. डी. सी. ॲण्ड ए. परीक्षेची किमान ५० गुणांची अट लागू राहील.

| **Exemptions according to Old Syllabus by obtaining 50% marks** | **Exemption under New Syllabus** |
|---|---|
| Paper III - Cooperative & Other Laws | Paper V |
| Paper IV - Accounts | Paper II |
| Paper V - Cooperative Audit | Paper III |
| Paper VI - Banking | Paper VI |
| **Both** Paper I - Theory & History of Cooperation **and** Paper II - Cooperative Management | Paper IV - History, Principles & Management of Cooperatives |

Those who are unable to exempt either in Paper I and / or in Paper II of Old Syllabus have to appear for Paper IV - History, Principles & Management of Cooperatives, according to the New Syllabus.

(संदर्भ - शासन अधिसूचना क्र. सहक - १२११ / प्र. क्र. २७३ / १२ - स, दि. ३०/ १०/ २०१२)

## ८. प्रमाणपत्र :

१) जी. डी. सी. ॲण्ड ए. परिक्षेचे सर्व सहा विषय उत्तीर्ण होणा-या परीक्षार्थींना "सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन (सी. एच. एम.) **सह** शासकीय सहकार व लेखा पदविका (जी. डी. सी. ॲण्ड ए.)" परीक्षेचे प्रमाणपत्र आणि "जी. डी. सी. ॲण्ड ए." परीक्षेचे गुणपत्रक देण्यात येईल.

२) सी. एच. एम. परिक्षेचे सर्व तीन विषय उत्तीर्ण होणा-या परीक्षार्थींना "सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन (सी. एच. एम.)" परीक्षेचे प्रमाणपत्र आणि "सी. एच. एम." परीक्षेचे गुणपत्रक देण्यात येईल.

३) जी. डी. सी. ॲण्ड ए. परिक्षेच्या सहा विषयापैकी पहिले तीन विषय (विषय क्र. १ - मॅनेजमेंट ऑफ को.ऑप.हौसिंग सोसायटीज्, विषय क्र. २ - अकौंटस् आणि विषय क्र. ३ - ऑडिटिंग) उत्तीर्ण होणा-या परीक्षार्थींना "सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन (सी. एच. एम.)" प्रमाणपत्रासह "जी. डी. सी. ॲण्ड ए." परीक्षेचे गुणपत्रक देण्यात येईल.

## ९. परिक्षार्थींसाठी महत्वाचे :

१) अर्जदाराने विहीत मुदतीतच Online अर्ज भरण्याची कृपया दक्षता घ्यावी. याबाबत बोर्डाकडून कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. तसेच त्यासंदर्भात कोणत्याही पत्रव्यवहाराची बोर्डाकडून दखल घेतली जाणार नाही.

२) कोणत्याही कारणासाठी एकदा फेटाळण्यात आलेल्या आवेदनपत्राचा फेरविचार केला जाणार नाही. याबाबत बोर्डाचा निर्णय अंतिम राहील.

३) अर्जात खोटी माहिती देणे, अर्जासोबतच्या दस्तऐवजात खाडाखोड करणे या कारणांमुळे परीक्षार्थी परीक्षेसाठी कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरेल व इतर योग्य अशा शिक्षेला पात्र ठरेल.

**४) संबंधित अर्जदारांना प्रवेशपत्र (परीक्षेचे ठिकाण व आसन क्रमांक सह) डाऊनलोड (download) करून घेण्याबाबत Email, SMS द्वारे कळविण्यात येईल. या परिक्षेचे प्रवेशपत्र खात्याच्या Website वरुन परिक्षार्थींनी डाऊनलोड (download) करुन घ्यावे. यासाठी त्यांनी Online अर्ज भरताना तयार केलेल्या आपल्या User ID व Passward चा वापर करावा.**

५) परिक्षेचे निकाल जाहीर झाल्यानंतर परिक्षार्थींनी त्यांच्या निकालाची बोर्डाकडून देण्यात येणारी प्रत सबंधीत केंद्रप्रमुख तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयातून एक महिन्याच्या आत स्वत: घेऊन जाणे आवश्यक आहे. जे परिक्षार्थी स्वत: निकाल प्रत घेऊन जाणार नाहीत त्यांची प्रत त्यांच्या नोंदलेल्या पत्त्यावर निकाल प्रसिद्ध झाल्यानंतर एक महिन्यानंतर पोस्टाने पाठविण्यात येईल. परिक्षार्थींना, पत्त्यात बदल, अपूरा पत्ता वा अन्य कारणामुळे पोस्टाने निकाल प्राप्त न झाल्यास बोर्ड जबाबदार रहाणार नाही याची परिक्षार्थींनी नोंद घ्यावी.

६) Online अर्ज स्वीकारणार असल्याने नाव, कायमचा पत्ता, पत्रव्यवहाराचा पत्ता, पिनकोड, संपर्क क्रमांक, मोबाईल नंबर, Email ID, परिक्षेत सूट (असल्यास) याचा तपशील परिक्षार्थींनी बिनचूक नमूद करणे आवश्यक आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

७) अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीचे संगणकावर संस्करण केले जात असल्याने परीक्षार्थींनी दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्यामध्ये मागाहून कोणताही बदल झाल्यास त्याची दखल घेणे बोर्डाला शक्य होणार नाही, म्हणून पत्त्यात बदल झाल्यास परिक्षार्थींनी त्यांच्या अर्जावरील पत्त्यावर येणारी पत्रे नवीन पत्त्यावर परस्पर मिळतील अशी व्यवस्था करावी.

## १०. <u>परीक्षेचे वेळापत्रक :</u>

| दिनांक | विषय क्रमांक | विषय | वेळ |
|---|---|---|---|
| २३/०५/२०१५ | १ | मॅनेजमेंट ऑफ को.ऑप.हौसिंग सोसायटीज् | सकाळी १०.०० ते १.०० |
| २३/०५/२०१५ | २ | अकौंटस् | दुपारी २ .०० ते ५.०० |
| २४/०५/२०१५ | ३ | ऑडिटिंग | सकाळी १०.०० ते १.०० |
| २४/०५/२०१५ | ४ | हिस्ट्री, प्रिन्सिपल्स् ॲण्ड मॅनेजमेंट इन को.ऑपरेशन | दुपारी २.०० ते ५.०० |
| २५/०५/२०१५ | ५ | को.ऑपरेटिव्ह लॉज् ॲण्ड अदर लॉज् | सकाळी १०.०० ते १.०० |
| २५/०५/२०१५ | ६ | को.ऑपरेटिव्ह बँकिंग ॲण्ड क्रेडिट सोसायटीज् | दुपारी २.०० ते ५.०० |

(एस. बी. कुलगोड)

**सचिव, जी. डी. सी. ॲण्ड ए. बोर्ड तथा**
**उपनिबंधक, सहकारी सस्था, (परिक्षा व प्रशिक्षण),**
**महाराष्ट्र राज्य, पुणे- १.**

**पुणे**
**दि. ११/ ०१/ २०१५**

*****

## परिशिष्ठ - परिक्षा केंद्राचे नाव व केंद्र संकेतांक (सेंटर कोड) व संपर्क क्रमांक

| अ. क्र. | परीक्षा केंद्राचे नांव | सांकेतांक (सेंटर कोड) | परीक्षा केंद्रप्रमुखाच्या कार्यालयाचा पत्ता व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | मुंबई | ०१ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई (३),<br>कक्ष क्र. ६९, तळमजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),मुंबई ५१.<br>दूरध्वनी क्र.०२२-२६५९०९९७ |
| २ | ठाणे | ०२ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे,<br>वर्धावत मेन्शन, पहीला माळा,शिवाजीपथ, चेंदानी क्रॉसरोड, ठाणे (प),.<br>दूरध्वनी क्र.०२२-२५३३१४८६ |
| ३ | नाशिक | ०६ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक,<br>सहकार संकुल, सारडा सर्कल, मौलाना अबुल कलाम रोड, नॅशनल उर्दु हायस्कुल शेजारी, नाशिक<br>दूरध्वनी क्र.०२५३-२५९१५५५ |
| ४ | जळगांव | ०८ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव,<br>प्रशासकीय इमारत, १ला माळा, ३ रा टप्पा, आकाशवाणी चौक, जळगांव .<br>दूरध्वनी क्र.०२५७-२२३९७२९ |
| ५ | अहमदनगर | ०९ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर,<br>अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सह. बँक इमारत,स्टेशन रोड,अहमदनगर-४१४००१<br>दूरध्वनी क्र.०२४१-२४५००५५ |
| ६ | पुणे | १० | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (शहर)<br>साखर संकुल, शिवाजीनगर, शेतकी महाविद्यालय आवार, पुणे-४११००५<br>दूरध्वनी क्र.०२०-२५५३२३३५ |
| ७ | सोलापूर | ११ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर,<br>नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर<br>दूरध्वनी क्र.०२१७-२६२९७४९ |
| ८ | सातारा | १२ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा,<br>नविन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, एस.टी.स्टॅण्डजवळ, सातारा ४१५ ००१<br>दूरध्वनी क्र.०२१६२-२३४१४१ |
| ९ | सांगली | १३ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली,<br>कुबेरा चेंबर्स, मारुती शोरुमच्या माडीवर, वखार भाग अमराईच्या मागे, सांगली १६<br>दूरध्वनी क्र.०२३३-२६००३०० |
| १० | कोल्हापूर | १४ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर,<br>भुविकास बँक इमारत तिसरा मजला, पर्ल हॉटेलजवळ, स्टेशनरोड ,कोल्हापूर<br>दूरध्वनी क्र.०२३१-२६५६२५८ |
| ११ | औरंगाबाद | १५ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद,<br>शक्ती सहकार बिल्डींग, हॉटेल कार्तीकी समोर, औरंगाबाद<br>दूरध्वनी क्र.०२४०-२३३१०३७ |
| १२ | लातूर | २१ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर,<br>नवीन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, शिवाजी चौक, लातूर<br>दूरध्वनी क्र. ०२३८२-२४५१९३ |
| १३ | अकोला | २३ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,अकोला,<br>सहकार संकुल,आदर्श कॉलनी, अकोला<br>दूरध्वनी क्र.०७२४-२४५२७३० |

| अ. क्र. | परीक्षा केंद्राचे नांव | सांकेतांक (सेंटर कोड) | परीक्षा केंद्रप्रमुखाच्या कार्यालयाचा पत्ता व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १४ | अमरावती | २४ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती,<br>कांतानगर, विभागीय आयुक्त यांचे कार्यालयासमोर, अमरावती .<br>दूरध्वनी क्र. ०७२१-२६६१६३३ |
| १५ | नागपूर | २७ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर,<br>सहकार सदन, हिंदुस्थान कॉलनी, अमरावती रोड, नागपूर.<br>दूरध्वनी क्र. ०७१२-२५५१२१६ |
| १६ | चंद्रपूर | २९ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर,<br>प्रशासकीय भवन, २ रा मजला, बसस्थानकासमोर, चंद्रपूर.<br>दूरध्वनी क्र.०७१७२-२५०३८१ |

***